भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०८/२०१७

**१) मोटार पंपाची चोरी . :–**

दिनांक १७/०८/२०१७ चे १६.०० वा. ते दि. १८/०८/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादी रमेश विठठल दंडारे वय २६ वर्ष, रा. नेहारवानी यांनी शेतात पाणी देण्याकरीता शेता जवळील नाल्यावर लावलेली २ एचपी एलन कंपनीची मोटार पंप किंमती १३,०००/–रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०८/२०१७ चे ०६.०० ते १८.०० वा. दर. यातील फिर्यादी अल्पवयीन मुलगी हिला यातील संशयीत आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटारे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन बांबुच्या काठीने मारुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०८/२०१७ चे १४.०० ते १४.२० वा. दर यातील फिर्यादी जगदीश शिवराम खोब्रागडे वय ४५ वर्ष, रा. वाही हा कोंबळया पकडण्यासाठी जाडी मागण्या साठी आरोपीचे घरी गेला असता आरोपीची पत्नी सौ. रेखा हिचे सोबत तोंडा तोंडी भांडण झाल्याने यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला बांबुच्या काठीने आरोपी क्र. १ ने व डोक्यावर, पायावर, कमरेवर मारुन जबर दुखापत केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे बयान डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२५,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) जनावरे निर्दयतेने ट्रक मध्ये भरुन अती वेगाने चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

**अ)** दिनांक १८/०८/२०१७ चे १७.२५ वा. दर. यातील तीनही आरोपीतांनी आपले ताब्यातील ट्रक क्र. एमएच ३२ सीक्यु ३०१७ मध्ये २४ गोरे एकुण किंमती २,४०,०००/–रु. भरुन ट्रक हा अती वेगाने चालवत गोरे कत्तल खाण्यात घेवुन जाण्याचे उद्येशाने ट्रक मध्ये जनावरे निर्दयतेने भरुन जातांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कावळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,२८९ भादंवि. सहकलम ११(१)(घ)(ड)महा प्रा. नि.वा. का सहकलम ५(अ) प्रा. सं. अधि १९७६ सहकलम ११९ मपोका सहकलम ८३/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गभणे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**ब)** दिनांक १८/०८/२०१७ चे १९.०५ वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील ट्रक मध्ये २५ गायी, ९ गोरे, असे एकुण ३४ जनावरे एकुण किंमती ३,४०,०००/–रु. चे भरुन अती भरधाव वेगाने बेजबाबदारपणे वाहन चालवत गोरे कत्तलखाण्यात घेवुन जाण्याचे उद्येशाने ट्रक मध्ये जनावरे निर्दयतेने भरुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कावळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,२८९ भादंवि. सहकलम ११(१)(घ)(ड)महा. प्रा. नि.वा. का सहकलम ५(अ) प्रा. सं. अधि १९७६ सहकलम ११९ मपोका सहकलम ८३/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गभणे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) स्वत:ची गाडी पलटी होवुन गाडीचे कॅबीनमध्ये दबुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०८/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वाहन क्र. एमएच ३१ सीक्यु २२२९६ ला समोरुन धडक मारुन स्वत:ची गाडी पलटी करुन गाडीचे कॅबीन मध्ये दबुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मोसम शेख हकीरमीया शेख वय ४६वर्ष, रा. फुलचुर पेठ आयटीआय जवळ गोंदिया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नवखरे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) ट्रकच्या धडकेत एक जखमी . :**

दिनांक १८/०८/२०१७ चे ००१०ते ००१५ वा. दर. यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे वाहन क्र. एमएच ३० एल २९६८ ला समोरुन धडक मारुन फिर्यादीचे ट्रक चालकाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी चेतन विजय तेलगडे वय २४ वर्ष, रा. नांदोरा जि. बुलढाणा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोलीयेथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. रेवतकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**७) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १८/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, मोहाडी, कारधा, सिहोरा व दिघोरी येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभटटी दारु किंमती ५७४०/–रु. तसेच व जुगारातुन किंमती २१०/–रु. असा एकुण किमती ५,९५०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**सपोनी. पी. के. बोरकुटे**
**पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.९६५७४०७१७३**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.